जा.क्र. कार्या.15/मोबाईल टॉवर क्षेत्र/मूल्यदर/683
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य पुणे. यांचे कार्यालये,
पुणे - 411001,दि. 10/07/2015

परिपत्रक

विषय :- मोबाईल टॉवर उभारणीकरिता घेण्यात येणाऱ्या इमारतीवरील टेरेस क्षेत्राचे मूल्यांकन करताना विचारात घ्यावयाच्या दराबाबत.

दुय्यम निबंधक कार्यालयांकडून मोबाईल टॉवर उभारणीकरिता घेण्यात येणाऱ्या इमारतीवरील टेरेस क्षेत्राचे, मूल्य निर्धारित करताना सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना क्र.14 "गच्ची" (Terrace) विचारात घेण्यात येते व असे करीत असताना काही दुय्यम निबंधक कार्यालये गच्चीचे मूल्यांकन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील सदनिकेच्या दराच्या 25% दर तर काही दुय्यम निबंधक कार्यालये तळमजल्यावरील दुकाने/व्यवसायीक दराच्या 40% दर विचारात घेतात. राज्यात अशा प्रकरणी मूल्यांकनामध्ये एकसूत्रता आणणेच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कळविणेत येत आहे.

मोबाईल टॉवर उभारणीकरिता घेण्यात येणाऱ्या इमारतीवरील टेरेस क्षेत्राचे मूल्यांकन करताना, सदरचा वापर "वाणिज्य" म्हणून विचारात घेऊन, वार्षिक तक्त्यातील संबंधित मूल्य विभागातील वाणिज्य वापर (तळमजल्यावरील दुकाने/व्यावसायिक) दराच्या 40% दराने मूल्य परिगणित करणेत यावे.

उक्त परिपत्रकाची प्रत मा. नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharshtra.gov.in या संकेतस्थळावर publication या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
( डॉ. रामास्वामी एन. )
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा.सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2) मा.महालेखाकार (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

3) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4) उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश मूल्यांकन मुंबई.
5) सहायक संचालक, नगर रचना, मूल्यांकन, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक), पुणे.
   सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.
8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक मुंबई / कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / लातूर / अमरावती / नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
   -/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.
9) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कायालय, पुणे.

निर्गमित,
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता.

E:\Technical\Pune Dn\Pune Dist\Letter.doc 420